# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 25/01/2023 (बुधवार) दुपार

---

## रेती चोरी करणाऱ्या आरोपीविरूद्ध कारवाई

पो.स्टे. अरोली :– अंतर्गत १५ कि.मी. अंतरावर मौजा सलाईमेटा ते भंडारबोडी रोड येथे दिनांक २४/०१/२०२३ चे ११.०० वा. ते ११.१५ वा. दरम्यान फिर्यादी नामे– रितेश नारायण दुरुगकर, वय ३५ वर्ष, रा. सलाईमेटा ता. रामटेक जि. नागपूर हे गावातील भांडारबोडी रोडवर असलेल्या पेंच प्रकल्पाचे कांद्री कालव्या वरील पाणी पाहण्यासाठी सलाईमेटा ते भांडारबोडी कडे जाणाऱ्या रोडवरील पेंच प्रकल्पाच्या कालव्या वरील पुलावर गेले असता ०१ रेतीने भरलेला आरोपी टिप्पर क्र. एम.एच–४०/३५३४ चा चालक हा पेंच कालव्याच्या पुलावरुन सलाईमेटा गावाचे दिशेने उभ्या असलेल्या चालकास फिर्यादीने सलाईमेटा या गावाचे पोलीस पाटील या नावाने परीचय देऊन त्याच्या टिप्परमध्ये असलेल्या रेतीबाबत शासकिय परवानगी आहे का असे विचारले तर त्याने रेतीची रॉयल्टी नसुन ती चोरीची आहे असे फिर्यादीला सांगितले. फिर्यादीने लगेच अरोली पोलीसांना फोन केला असता टिप्पर चालकाने घाबरुन त्याने लगेच त्याच्या त्या टिप्परमध्ये असलेल्या चोरीची संपुर्ण ०३ ब्रास रेती किंमती अंदाजे असा एकुण ६०००/–रु. कालव्याचे पुलावर खाली करुन त्याचे ताब्यातील टिप्पर क्र. एम. एच.–४०/३५३४ हा भांडारबोडीच्या दिशेने घेवुन पळून गेला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रीपोर्टवरून पोलीस स्टेशन अरोली येथे आरोपीविरूद्ध कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला असुन आरोपीचा शोध घेणे सुरू असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नायक उमेश इंगळे ब. नं. ८०६ मो. क्र. ९९२३४६३४६१ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**